# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 18 October 2026

Time 7.10 to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- कर्करोगाच्या PET-CT स्कॅन या तपासणीचा 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत' समावेश
- दुष्काळी परिस्थितीत संभाव्य बालविवाह रोखण्यासाठी सतर्क राहावं-राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचं आवाहन
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी सर्वंकष कार्यपद्धती निश्चित
- अर्भकांसाठीच्या खाद्यपदार्थांमध्ये सुक्रोज आणि फ्रुक्टोज मिसळण्यास निर्बंध घालण्याचा भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचा प्रस्ताव

आणि

- भारत -वेस्टइंडीज दरम्यान पाचवा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना पावसाच्या व्यत्त्ययामुळे अनिर्णित; मालिका दोन -दोन ने बरोबरीत

****

'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत' PET-CT स्कॅन या तपासणीचा समावेश करण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागानं यासंदर्भातला शासन निर्णय जारी केला. ६३ कर्करोग उपचारांच्या पॅकेजमध्ये PET-CT तपासणीचा 'अतिरिक्त निदान प्रक्रिया' म्हणून, तर निवडक १३ प्रकारच्या कर्करोगांसाठी पेट-सीटी स्कॅनचा स्वतंत्र अथवा नियमित प्राथमिक निदान प्रक्रिया म्हणून समावेश करण्यात आला

आहे. या निर्णयामुळे कर्करुग्णांना स्वतःच्या खिशातून महागड्या तपासणीसाठी खर्च करण्याचा भार कमी होणार आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या दुष्काळी परिस्थितीचा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल आढावा घेतला. पीक नुकसानाचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकता राखावी आणि पाणीटंचाईवर उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून नागरिकांना मदत करावी, अशी सूचनाही पालकमंत्री पवार यांनी केली.

****

दुष्काळी परिस्थितीत संभाव्य बालविवाह रोखण्यासाठी सर्वांनी सतर्क राहावं, असं आवाहन महिला आणि बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केलं आहे. त्या काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होत्या. बालविवाहांचं प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवत, नागरिकांचं प्रबोधन करण्याची गरज बोर्डीकर यांनी व्यक्त केली. त्या म्हणाल्या...

**बाईट – महिला आणि बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर**

दुष्काळी परिस्थितीत सामूहिक विवाह सोहळ्यांना प्राधान्य द्यावं, महिलांच्या आरोग्याकडे तसंच मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावं, तसंच जलसाक्षरतेसाठी जनजागृती करावी, असंही बोर्डीकर यांनी सांगितलं. शक्तिपीठ ते भक्तिपीठ नारीशक्ती संवाद उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या विविध कार्यक्रमांना त्या उपस्थित होत्या. धाराशिव इथून सुरू झालेल्या नारीशक्ती संवादाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यात तीन टप्प्यांत सामुहिक विवाह सोहळ्यांचं आयोजन करण्यात येणार आहे. पहिला टप्पा २५ आणि २६ नोव्हेंबर, दुसरा १४ आणि १५ डिसेंबर आणि तिसरा टप्पा ३० आणि ३१ डिसेंबर २०२६ रोजी होणार आहे. इच्छुक वधू-वरांनी परिसरातल्या अंगणवाडी सेविकांशी संपर्क साधून नावनोंदणी करावी, असं आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलं आहे. पात्र नवदाम्पत्यांना शासनाच्या विविध योजनांतून २५ हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी सर्वंकष कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, जिल्हास्तरीय पाणी टँकर संनियंत्रण आणि प्रत्यक्ष पाहणी समिती गठित करण्यात आली आहे. ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या संभाव्य टंचाई कालावधीसाठी ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्ह्यात संभाव्य चारा टंचाईच्या व्यवस्थापनासंदर्भात जिल्हा प्रशासनाने चतुःसूत्री उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू केली आहे. जिल्ह्यात सध्या सुमारे चार लाख ४९ हजार मेट्रिक टन चारा उपलब्ध असून, भविष्यात चारा टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी पशुधारकांमध्ये चारा साक्षरता आणि संवर्धन अभियान सुरू करण्यात आलं आहे. यासंदर्भात पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय सहाय्यक आयुक्त डॉ. असरार अहमद यांनी अधिक माहिती दिली. ते म्हणाले,

**बाईट – पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय सहाय्यक आयुक्त डॉ. असरार अहमद**

****

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिवाळीसाठी शेतकऱ्यांना २० हजार रुपये आणि शेतमजुरांना १० हजार रुपयांची आर्थिक मदत तातडीने करावी अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. ते काल धाराशिव इथं माध्यमांशी बोलत होते. राज्य सरकारनं जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदत तुटपुंजी असून, त्यात वाढ करण्यासंदर्भात आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचं आठवले यांनी सांगितलं.

दरम्यान, आठवले यांनी काल धाराशिवसह परभणी आणि लातूर जिल्ह्यात पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

****

दुष्काळी परिस्थिती आणि संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर धाराशिव शहरातल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करून जनावरांसाठी चारा उपलब्ध करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. राघूचिवाडी तलावातल्या पाण्याचा वापर करून सुमारे ५० हेक्टर क्षेत्रावर ज्वारीची लागवड करण्याचं नियोजन आहे. यासाठी तलावातला पाणीउपसा बंद करण्याच्या आदेशाचा फेरविचार करून आवश्यक परवानगी देण्याचं नियोजन असल्याची माहिती, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

****

अर्भकांसाठीच्या खाद्यपदार्थांमध्ये सुक्रोज आणि फ्रुक्टोज मिसळण्यास निर्बंध घालण्याचा भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचा प्रस्ताव आहे.

प्राधिकरणाने अन्न सुरक्षा आणि मानक विनियम, २०२० मध्ये सुधारणेसाठी मसुदा प्रसिद्ध केला आहे. बालकांच्या वयानुसार त्यांच्या पोषणाच्या गरजा पूर्ण करणारे अन्नपदार्थ तयार केले जावेत, याची खात्री करणं, तसंच आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात सहा महिन्यांपर्यंतच्या बालकांचा अतिरिक्त शर्करेशी कमीत कमी संपर्क यावा, यावर या मसुद्यात भर देण्यात आला आहे.

****

राज्यातल्या सर्व शाळांमध्ये उद्यापासून ३१ ऑक्टोबर पर्यंत 'चला शाळेत जाऊ या...ही विशेष शालेय स्वच्छता मोहीम' राबवण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. शाळा परिसर स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि आनंददायी ठेवण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, पर्यावरण-संवर्धन, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जबाबदारी आणि शिस्तीची भावना रुजवणं, हा या मोहिमेचा उद्देश आहे.

****

रास्तभाव दुकानांच्या वेळेची मर्यादा ओलांडून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या सोयीच्या वेळी अन्नधान्य उपलब्ध व्हावं, या उद्देशानं नाशिक इथं, राज्यातल्या पहिल्या अत्याधुनिक 'अन्नपूर्ती धान्य एटीएम'चं उद्घाटन अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते झालं. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सुमारे ५४ हजार रास्तभाव दुकानं कार्यरत असून, त्यांच्यामार्फत सुमारे सात ते साडेसात कोटी लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ दिला जातो. धान्य एटीएमच्या सुविधेमुळे लाभार्थ्यांना अधिक सोयीच्या वेळी धान्य मिळवणं शक्य होईल, असं भुजबळ यांनी सांगितलं.

****

शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शिक्षकांना बळजबरीने मतदान करण्यास भाग पाडणाऱ्या तसंच मतदान न केल्यास शाळेतून काढून टाकण्याची धमकी देणाऱ्या संस्थांविरोधात कठोर कारवाईचा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. काल ते नागपूर इथं प्रसारमाध्यमांशी बोलत होते. मराठवाड्यात वृक्षलागडीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या वापराबाबतही चौकशी करण्यात येईल, असं बावनकुळे यांनी सांगितलं आहे.

****

सेवा संकल्प अभियानांतर्गत हिंगोली जिल्ह्यातल्या ८७५ जिल्हा परिषद शाळांमध्ये पुस्तकदान हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये शाळांचा उत्स्फूर्त

सहभाग लाभला. या उपक्रमातून जिल्ह्यात एकूण १८ हजार ९८१ पुस्तकांचं संकलन आणि वितरण करण्यात आल्याचं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी सांगितलं.

****

जालना जिल्ह्यातल्या अंबड इथल्या श्री मत्स्योदरी देवीच्या शारदीय नवरात्रोत्सवात काल सातव्या माळेनिमित्त हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यात्रेच्या मुख्य दिवशी पहाटेपासून मंदिरात दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दिवसभरात सुमारे साडेआठशे बालकांचे नवस फेडण्यात आले, तर जवळपास एक हजार भाविकांनी मंदिराच्या पायऱ्यांवर नारळ फोडून देवीप्रती श्रद्धा व्यक्त केली. मंदिर परिसरात ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी लिफ्ट आणि स्वतंत्र दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती.

****

तुळजापूर इथं शारदीय नवरात्र महोत्सवात काल सातव्या माळेच्या दिवशी श्री तुळजाभवानी देवींची शेषशायी अलंकार महापूजा मांडण्यात आली होती.

****

भारत -वेस्टइंडीज दरम्यान काल झालेला पाचवा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना पावसाच्या व्यत्ययामुळे अनिर्णित राहिला. त्यामुळे पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ दोन -दोन असे बरोबरीत राहिले. बंगरुळू इथं काल झालेल्या पाचव्या सामन्यात सुरुवातीलाच पावसाच्या अडथळ्यामुळे प्रत्येकी नऊ षटकांचा सामना खेळवण्याचं निर्धारित झालं. नाणेफेक जिंकत वेस्ट इंडीजनं भारताला फलंदाजीला पाचारण केलं. भारतानं तीन बाद ११८ धावा केल्या. मात्र, पुन्हा मुसळधार पावसामुळे पुढील खेळ होवू शकला नाही.

****